# कष्टाची भाकरी : श्रमपतिष्ठा व ध्येयवाद जागवणारी,जपणारी कथा

**प्रास्ताविक : -**

साधारणत : इयत्ता बारावी पर्यंत विद्यार्थ्यांना विशिष्ट लेखकांचे मर्यादित अवकाशातील पाठ अभ्यासासाठी असतात. या अभ्यासात भाषा, आकलन, व्याकरण या घटकांवर अधिक भर दिलेला असतो. त्यामुळे विद्यार्थ्याला कविता, कथा, लेख यांची ओळख करून देऊन भाषेबद्दलची एक विशिष्ट अशी जाणीव या पातळीवरील विद्यार्थ्यांना व्हावी यादृष्टीने साहित्याचे अध्यापन केले जाते. परंतु पुढील वर्गात जेव्हा हे विद्यार्थी येतात तेव्हा मात्र अभ्यासक्रम हा त्या विद्यार्थ्यांच्या क्षमता, आकलन, साहित्य विषयक दृष्टीकोन, समाज विषयक दृष्टिकोन,विकसित होत जावा या दृष्टीने तयार करण्यात आलेला असतो. मराठी साहित्य कथा आणि भाषिक कौशल्य विकास, एकांकिका आणि भाषिक कौशल्य विकास हा सध्याचा अभ्यासक्रम खूप मौलिक आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने दिशादर्शक असा आहे. या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील साहित्यविषयक आकलन आस्वाद आणि मूल्यमापन क्षमता विकसित होण्यासाठी मदत होणार आहे तसेच विद्यार्थ्यांची साहित्य अभ्यासातून जीवनविषयक समज विकसित होण्यासाठी मदत होईल. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या युगात आज विद्यार्थ्यांकडे विविध कौशल्य असणे आवश्यक आहे. त्यामुळे मराठी भाषेचे उपयोजनात्मक कौशल्य विकसित होण्याच्या दृष्टीनेही या अभ्यासक्रमाची रचना अतिशय चांगल्या पद्धतीने करण्यात आलेली आहे. या घटकांमध्ये आपण समकालीन मराठी कथा या पुस्तकातील कष्टाची भाकरी या कथेचा परिचय करून घेणार आहोत.या सर्व कथांमध्ये विविधता आहे. या कथा समकालीन जीवनानुभव अतिशय तीव्रपणे प्रकट करताना दिसतात. या कथांमध्ये ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लिम, ग्रामीण, महानगरीय, विनोदी अशा प्रवाहातील काही निवडक कथा निवडलेल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना समकालीन मराठी कथेची ओळख होण्यास निश्चितच मदत होईल. विद्यार्थ्यांची आकलन क्षमता विकसित होण्याच्या दृष्टीने निवड केलेल्या कथा उत्तम आहेत. आता आपण सचिन पाटील यांच्या कष्टाची भाकरी या कथेची सविस्तर ओळख करून घेणार आहोत.

**लेखक परिचय : -** १० जुलै १९७८ नव्या पिढीतील सशक्त व महत्त्वाचे ग्रामीण कथाकार सांगावा, आणि अवकाळी विळखा हे दोन कथासंग्रह प्रकाशित. साहित्य लेखनासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद इस्लामपूर शाखेचा पुरस्कार, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर यांचा शंकर खंडू पाटील पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा गुहागर यांचा उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार, साहित्य साधना पुरस्कार उदगीर, अभिव्यक्ती पुरस्कार नागपूर, महाराष्ट्र शासन व समाज कल्याण विभाग यांच्या वतीने दिव्यांग प्रेरणा आधी पुरस्कार त्यांना लाभले आहेत. समकालीन ग्रामीण प्रश्न, विदारक वास्तव व परिस्थितीवर प्रभावी भाष्य हे त्यांचे लेखन वैशिष्ट्य आहे. त्यांच्या कथा शेतकरी, कष्टकरी वर्गांची सुख दुःखे, व्यथा-वेदना, समस्यांना शब्दबद्ध करून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न करतात. कष्टाची भाकरी ही कथा ग्रामीण जगण्यातल्या वास्तवावर अतिशय तीव्रपणे भाष्य करताना दिसते.विनायक नावाच्या तरुणाची ही कथा जेव्हा आपण वाचायला लागतो. तेव्हा शेवटची ओळ येईपर्यंत आपण ही कथा वाचताना अजिबात थांबत नाही.या कथेतील आशय त्याची केलेली गुंफण आणि मानवी जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष लेखकाने खूप चांगल्या पद्धतीने चित्रित केलेला आहे. आजच्या प्रत्येक तरुणाला ही कथा त्याचे आयुष्य घडविण्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

**कथेतील पात्रे : -** विनायक

**कष्टाची भाकरी ही कथा सचिन पाटील यांच्या अवकाळी विळखा या कथासंग्रहातून घेतलेली आहे.**

## कथेविषयी : -

समकालीन शेती, शेतकरी, कष्टकरी, मजूर या सर्वांचा विचार केला तर आपल्याला दिसून येते की, शेतीच्या समस्या परंपरागत आजही चालू आहेत. म्हणजे निसर्गाच्या भरवशावर असलेली शेती, बाजार भाव, काय मिळेल हे निश्चित नाही तेथेही अंदाज बांधत राहणे एवढेच शेतकऱ्याच्या हातात, पतसंस्था, बँका यांचे कर्ज काढत राहणे, व्याज भरत राहणे, सात बारा बँकांच्या ताब्यात असणे हया सर्व वातावरणात आजचा शेतकरी शेती करताना दिसतो. त्याच्या आशा, अपेक्षा आकांक्षा ह्या एक तर निसर्गावर अवलंबून असतात किंवा दुसऱ्या बाजूला त्याच्या मालाला चांगला भाव मिळेल आणि त्या मिळालेल्या पैशातून त्याने पाहिलेली स्वप्नं असतात. हे त्याचे विश्व असते. हाच शेतकरी वर्षानुवर्षे शेतीमाल पिकवत हजारो लोकांचा पोशिंदा राहत आलेला आहे. कष्टाची भाकरी या कथेत विनायक या तरुण शेतकऱ्याची व्यथा अत्यंत संवेदनशीलपणे लेखकाने रेखाटलेली आहे. खरं तर समकालीन समाज जीवनात विनायक हे प्रातिनिधिक उदाहरण आहे. आज अनेक शेतकऱ्यांची हीच अवस्था आहे. त्यामुळे समकालीन शेतीची अवस्था, शेतकऱ्यांची अवस्था, लेखकानी ज्या पद्धतीने चित्रित केली आहे त्यामध्ये लेखक यशस्वी ठरलेला आहे.

विनायक नावाचा तरुण शेतकरी. त्यानी द्राक्ष बागेची लागवड केली असते. द्राक्षाचे चांगले उत्पादन होईल व पैसाही भरपूर मिळेल या आशेवर विनायकने द्राक्ष बागेची लागवड केलेली असते. परंतु सलग दोन-तीन वर्षापासून पडणाऱ्या रोगानं,अवकाळी पावसानं द्राक्ष बागेचं प्रचंड नुकसान होतं. व त्याच्यावर असलेले कर्ज मात्र एका बाजूला वाढतच राहत. आता मात्र त्याच्या पाठीमागे बँकेने तगादा लावला. कर्ज कसे फेडायचे या विचारात तो असतो. तेवढ्यात बँकेने जप्तीची नोटीस काढली म्हणून विनायकने शेती चुलत्याला गहाण म्हणून द्यायची असं ठरवलं. बारा वर्षे व्याज म्हणून चुलत चुलत्यान रानं खायचं असं ठरलं. त्यांने बँकेकडून स्वतःची सुटका करून घेतली. आता पुढे काय हा प्रश्न त्याच्यासमोर होता. कारण विनायक हा बी. कॉम. झालेला असतो. त्यामुळे रोजंदारीवर कामाला जायची त्याला लाज वाटते. म्हणून तो नोकरी करायची ठरवतो. नोकरीसाठी तो खूप प्रयत्न करतो. परंतु यश मात्र येत नाही. शेवटी हताश होऊन तो घरी परत येतो. या सर्व अवस्थेत त्याला व्यसन जडते. तो आकडा हा व्यवसाय खेळू लागतो. आणि हळूहळू तो या आकड्याच्या खेळात पाण्यासारखा वाहत जातो. त्याला कशाचेच भान राहत नाही. तो या आकड्यांच्या खेळात आपले सर्वस्व गमावतो. एके दिवशी पत्नीचे दागिने तो या आकड्यांच्या खेळात लावतो. आता आपण प्रचंड श्रीमंत होऊ असं त्याला वाटतं. त्या रात्री तो स्वप्नांच्या दुनियेत झोपून जातो. सकाळी उठल्याबरोबर तो आकड्यांच्या खेळाचा निकाल पाहण्यासाठी गेला तर तो सपशेल हरलेला असतो. त्याचे सर्व पैसे वाया गेलेले असतात. तो प्रचंड आतून-बाहेरून बदलून गेलेला असतो. त्याला आता काही सुचत नव्हते. त्याच्या पायाखालची जमीन सरकली होती.आता आपण आपल्या बायका मुलांना तोंड कसं दाखवायचं हा प्रश्न त्याच्यापुढे पडलेला असतो. त्यामुळे या सर्व परिस्थितीत तो स्वतःला संपवण्याचा विचार करतो. परंतु एका क्षणी त्याला आपली लहान मुले आठवतात, बायको आठवते आणि तो तडकपणे पुन्हा आपल्या घराच्या दिशेने चालू लागतो. सकाळी लवकर उठतो माळ्यावर पडलेलं खोर हुडकून काढतो. आंघोळ करताना ते पाण्याने स्वच्छ धुऊन काढतो. आता त्यानी निवडलेला मार्ग कष्टाचा होता. काट्याकुट्यातून जाणारा होता पण घामाचे मोती करणारा होता. त्याला वाटत होते लोक हिणवतील, चार दिवस हसतील पण इमानदारीने राबणाऱ्या हातांना भीती कोणाची ? हा विचार तो करतो.

खांद्यावर खोरं टाकून तो नाना गवंड्याच्या घराकडे चालू लागतो. कारण आता त्याला कष्टाच्या भाकरीची चव चाखायची होती. त्याच्या या बदलामुळे घरातील वातावरण आनंददायी झाले होते. अशा प्रकारे लेखकाने सकारात्मक शेवट करत ही कथा शेवटच्या क्षणी एका विशिष्ट उंचीवर नेऊन पोहोचवली आहे. ही कथा वाचनीय तर आहेच. तसेच आपल्या प्रत्येकाला विचार प्रवृत्त करायला लावणारी सुद्धा आहे.

## ग्रामीण वास्तवाचा परखड वेध घेणारी कथा :-

१९७५ नंतरच्या ग्रामीण कथेतून रा.रं.बोराडे, आनंद यादव, रणजित देसाई, भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले, चारुता सागर, आनंद पाटील, प्रतिमा इंगोले, सदानंद देशमुख,आसाराम लोमटे इ.व अशा इतर अनेक कथाकारांनी ग्राम जीवनाच्या

विविध पैलूंचे दर्शन घडवले आहे. ग्रामीण जीवनातील शोषणाच्या विविध परी या लेखकांनी व्यक्त केल्या आहेत. यासंदर्भात ग्रामीण जीवनातील तीव्र असलेल्या जातिभेद, स्त्री-पुरुष विषमता यांचे थेट चित्रण या लेखनात येते. त्याचबरोबर ग्रामीण जीवनात वसलेले शहर आणि तकलादू आधुनिकता, निसर्गावर अवलंबून असलेली शेती, शिकलेल्या तरुणाची ससेहोलपट अशी काही नवी आशयसूत्रे या काळातील ग्रामीण कथेत आढळतात. बदलत्या ग्रामीण जीवनाचे तटस्थपणे आकलन करणारा निवेदक या कथांमधून आढळतो.

अलीकडच्या काळातील सचिन पाटील हे ग्रामीण साहित्यातील एक दमदार नवे लेखक म्हणून नावारूपाला येत आहेत. त्यांनी त्यांच्या अवकाळी विळखा या कथासंग्रहातील कष्टाची भाकरी या कथेत ग्रामजीवनातील एका नव तरूणाची शेतीतून पीक घेऊन चांगले पैसे मिळवून आयुष्य बदलण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणाची व्यथा जिवंतपणे चित्रित केलेली आहे. या कथेतून आपल्याला ग्रामजीवनातील नवीन समस्या, प्रश्न यांची ओळख होते. तसेच आज खेड्यातील बदलते समाज वास्तव या वास्तव बरोबरच खेड्यातील माणसांचे बदलणारे स्वभाव, बदलणारे नातेसंबंध या सर्व गोष्टींना केंद्रवर्ती ठेवून लेखकाने शेतीशी असणारी मानवी जीवनाची नाळ, तसेच शेतीवर अवलंबून असलेला शेतकरी, त्याची सुख,दुःखे आणि तो पाहत असलेली स्वप्ने अत्यंत प्रत्ययकारी रीतीने चित्रित केलेली आहेत. १९९० च्या दशकात ग्रामीण, शहरी जीवनात झपाट्याने बदल होत गेले आहेत. या दशकात जागतिकीकरण, शेतमालाचे भाव, एकाधिकार आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांची चर्चाही साहित्यात झालेली आपल्याला दिसून येते. ग्रामीण जीवन आणि या जीवनातील गुंतागुंत उकलन्याचं चांगलं कार्य १९७५ नंतरच्या ग्रामीण कथा लेखकांनी केलेले आपल्याला दिसून येते. ग्रामीण जीवनातील प्रत्यक्ष अनुभूती या कथाकारांनी समर्थपणे रेखाटलेली दिसते. या कथाकारांनी ग्रामजीवनातील समस्यांमध्ये असलेल्या विविध गुंतागुंतीचे चित्र आपल्या कथांमधून केलेले दिसून येते. म्हणूनच सचिन पाटील यांनी कष्टाची भाकरी या कथेतून ग्रामजीवनातील या वास्तवावर परखडपणे भाष्य केले आहे. ते सर्वांना विचार करायला प्रवृत्त करणारे आणि एकूणच आजच्या ग्रामीण वास्तवाला नवी दिशा दाखवणारे आहे.

**कथेची वैशिष्टये : -** कष्टाची भाकरी या कथेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आपल्याला सांगता येतील.

१.कष्टाची भाकरी ही कथा श्रमप्रतिष्ठा आणि ध्येयवाद जागवणारी व जपणारी कथा आहे.

२.व्यसन, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, दुःख, शोषण, निराशा यावर श्रम, घाम आणि ध्येयाद्वारे मात करता येते हा संदेश ही कथा आपल्याला देते.

३. पारंपरिक असो वा आधुनिक शेती असो बदलते अर्थकारण, अस्मानी व सुलतानी संकटे, यामुळे शेतकऱ्यांची उपेक्षा संपत नाही. अशा परिस्थितीत आत्मभान जागे ठेऊन श्रम या मूल्याचा दीप प्रज्वलित केल्यास जगण्याचा मार्ग सापडतो असा संदेश ही कथा देते.

४. या घटनाप्रधान कथेचे प्रवाही कथानक,अर्थपूर्ण शेवट आणि ग्रामीण बोलीमुळे कथेला उंची प्राप्त होते.

५.कष्टाची भाकरी हे मूल्य अतिशय प्रत्ययकारी रितीने ही कथा वाचकासमोर उभे करते.

६.विनायकचा संघर्ष, हतबलता, निराशा आणि शेवटी विनायक ने त्यावर मिळवलेला स्वतःच्या कष्टातून विजय हे सर्व वाचकाला प्रचंड ऊर्जा देणारे असे आहे.

७. जगण्याकडे सकारात्मक वृत्तीने कसे बघायला हवे याचे उत्तम उदाहरण ही कथा आहे.

८. आजच्या वास्तव जगण्याला ही कथा सहजपणे भिडलेली दिसते.

९. ही कथा आजच्या तरुणांसमोर एक आदर्श उदाहरण म्हणून निश्चित सांगता येईल.

१०.बदलते अर्थकारण आणि शेतकऱ्यांचे जगणे, त्याच्या वाट्याला आलेले दुःख, त्या दुःखाला वाचा फोडणारी एक ज्वलंत शब्दबद्ध कथा म्हणून कष्टाच्या भाकरीचा उल्लेख आपल्याला करावाच लागेल.

**सारांश : -**

समकालीन शेती प्रश्नांच्या संदर्भात असणारे प्रश्न शेतकरी, त्याच्या संदर्भात असणारे प्रश्न, शेतकरी त्याच्या जगण्याचा संघर्ष, त्याला संकटांचा करावा लागणारा सामना या सर्व गोष्टींवर मार्मिक भाष्य ही कथा करताना दिसते. विनायक चा संघर्ष या सर्व गोष्टींवर मार्मिक भाष्य करताना दिसतो. विनायकचा संघर्ष हा प्रातिनिधिक आहे. परंतु आपल्या अवती भोवती समाजात जेव्हा आपण बाहेर डोकावतो तेव्हा विनायक सारखे संकट स्वतःवर आलेले अनेक शेतकरी आपण पाहतो. खरं तर शेतकऱ्यांच्या आशा, अपेक्षा आणि आकांक्षा या सर्व निसर्गावर आणि शेतीतून निघणाऱ्या उत्पादनावर अवलंबून असतात. आयुष्यभर तो शेतकरी अहोरात्र कष्ट असतो. परिस्थितीशी झगडत असतो.

कष्टाची भाकरी या कथेतून एका बाजूला विनायकचा संघर्ष, त्याची हतबलता, पराभव हे सर्व चित्रित होताना दिसते. त्यावेळी वाचक विनायकबद्दल संवेदनशील होत जातो. परंतु लगेच दुसऱ्या बाजूला विनायकने त्या प्रतिकूल परिस्थितीवर केलेली मात, जगण्यासाठी निवडलेला कष्टाचा मार्ग वाचकाची उमेद वाढवणारा असतो. म्हणूनच ही कथा एका अर्थाने जीवन जगण्याची प्रेरणा देणारी कथा आहे.

**महत्त्वाचे शब्द व त्यांचे अर्थ : -**

| अ.नं | शब्द | अर्थ |
|---|---|---|
| १. | मोक्यात | महत्त्वाची वेळ |
| २. | दावण्यानं | द्राक्ष बागेवरील रोगभेळ |
| ३. | काढणी | द्राक्षांची तोडणी |
| ४. | अवकाळी पाऊस | अचानक येणारा पाऊस/ पावसाळा सुरू होण्यापूर्वीचा पाऊस |
| ५. | आंदर बट्ट्यात. | तोट्यात |
| ६. | व्हायरस | आजार |
| ७. | बोकांडी | खर्चाचा बोजा / डोंगर |
| ८. | अग्नीचक्रात | संकटात |

| | | |
|---|---|---|
| ९. | होरपळ | दुःख |
| १०. | तुंबलेली देणी | उसने पैसे देणे/उसनवारीने घेतलेली रक्कम |
| ११. | घानवट | गहाण |
| १२. | गडी | रोजंदार /मजूर |
| १३. | ग्रॅज्युएट | पदवीधर |
| १४. | रेटणं | पुढे जाणं |
| १५. | विपन्न अवस्था | दुःख / संकटकालीन परिस्थिती. |
| १६. | आकडा | जुगाराचा प्रकार |
| १७. | हुडकायचा | शोध घेणे |
| १८. | दळभद्री जीवन | दुःखी /हताश जीवन |
| १९. | घामाचे मोती | कष्टाचे फळ |
| २०. | इमानदारीने | प्रामाणिकपणाने |

अशा पद्धतीने आपल्याला कष्टाची भाकरी या कथेचे विश्लेषण करता येईल. कष्टाची भाकरी ही कथा आजच्या तरुणांना एक प्रकारे मार्गदर्शन तर करतेच तसेच प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत माणूस विवेकशील विचार करत गेला, परिस्थितीशी तडजोड करत, संवाद करत नवे मार्ग शोधत गेला तर जगण्याचा रस्ता नक्की सापडत जातो. याचे उत्तम भाष्य ही कथा आपल्याला करताना दिसून येते म्हणूनच प्रत्येकाने वाचावी अशी ही कथा आहे.

**संदर्भ :-**


१. लांडगे शिरीष, पवार दिलीप, सांगळे संदीप (संपा), समकालीन मराठी कथा, अक्षरबंध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जून २०१९.

२.गणोरकर प्रभा व इतर (संपा), संक्षिप्त मराठी वाङ् मय कोश १९२० पासून २००३ पर्यंतचा कालखंड, ग. रा.भटकळ फाउंडेशन, मुंबई, दुसरे पुनर्मुद्रण सप्टेंबर २०१३.

३. वरखडे मंगला, स्त्रियांचे कथालेखन नवी दृष्टी, नवी शैली, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती / दुसरी आवृत्ती २००५.

४.मराठी वाङ् मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग दुसरा, जाधव. रा.ग. (मुख्य संपा.व इतर ), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी २०१०.

५. मराठी वाङ् मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग तिसरा १९५० ते २००० ,जाधव.रा.ग.(मुख्य संपा.व इतर ), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती,ऑक्टोबर २०१०.

**प्रा.डॉ.हरेश संपत शेळके,**
**मराठी विभागप्रमुख,**
**मराठी विभाग,**
**न्यू आर्टस् कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज पारनेर,**
**भ्रमणध्वनी -९७६७१७६६५१.**
**ईमेल - hareshelke@gmail.com**